

प्रेरणास्थान
श्री. सुरेशदादा जैन

**SEED**

Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना



मातोश्री श्रीमती प्रेमाबाई भिकमचंदजी जैन
उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना

# ज्ञानयज्ञ

***आमचे ध्येय:***
*गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक व उद्योजकीय कौशल्ये विकसित करून त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे.*



## उद्योजकीय कौशल्यांचा विकास

वर्ष ७ | अंक १९ | जानेवारी–एप्रिल २०१८

# "कौशल्य विकास – नवी आव्हाने"





**आज साक्षरतेचे प्रमाण खूप वाढले आहे. पदवी घेऊन बाहेर पडणारे खूप आहेत. त्यामानाने खाजगी व सरकारी नोकऱ्यांची संख्या खूप कमी आहे. आपली व्यवस्था या सगळ्यांना नोकऱ्या देऊ शकत नाही. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगार तरूणांची संख्या वाढते आहे. सरकारी नोकऱ्यांमधील कपातीचे धोरण, खाजगी कंपन्यांचे यांत्रिकीकरण व ऑटोमेशनचा वाढता प्रचार व प्रसार यामुळे नोकऱ्या स्वप्नवत झाल्या आहेत. अशा परिस्थितीत तरूणांनी नोकरी करण्यापेक्षा नोकरी देणारे बनण्याची गरज आहे. त्यासाठी त्यांनी उद्योजक बनणे हा एकच उपाय आहे.**

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

सप्रेम नमस्कार. आजच्या धकाधकीच्या आणि स्पर्धेच्या युगात प्रत्येकाला यशाची आणि प्रसिद्धीची अपेक्षा असते. आजचं जीवन अतिशय गतीमान झालेलं आहे. ते जितके सहज दिसते तितके सहज नाही. असंख्य आव्हाने आपल्या मार्गात अडसर म्हणून ठाकणार आहेत. जिद्द, मेहनत, कष्ट, लक्ष, ध्यास, तडजोड, संयम, सहनशीलता, त्याग, सातत्य, धडपड याशिवाय जीवनात यश शक्य नाही. 'यश' ही संकल्पना व्यक्तीसापेक्ष आहे. व्यक्तिपरत्वे त्याचा अर्थ भिन्न–भिन्न असतो.

यशप्राप्तीसाठी सर्वांना मार्गदर्शन हे एसडी–सीडचे ध्येय आहे. 'कौशल्य विकास' हा उद्योजकतेचा आधार आहे. त्याची उपेक्षा होवू नये म्हणून एसडी–सीडच्या वतीने नेहमीच सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. तरूणांना आत्मनिर्भर करणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांच्यात सन्मानाने जगण्याची उमेद निर्माण करणे हे एसडी–सीडचे कार्य आहे. त्यासाठी उद्योग, शिक्षण, तंत्रज्ञान, विज्ञान, कला, क्रीडा इत्यादी क्षेत्रातील नामांकित व यशस्वी मान्यवरांची प्रबोधनपर व्याख्याने, कार्यशाळा व प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जातात. तरूणांना उत्कृष्ट कार्यासाठी गौरव करणे, त्यांना अधिकाधिक शिक्षित करण्यासाठी प्रोत्साहन देणे, त्यांना आर्थिक मदत करणे, शिष्यवृत्ती देणे इ. उपक्रम राबविले जात आहेत.

यशप्राप्तीसाठी सर्वांनी सवयींचं पालन करणे गरजेचे आहे जे सर्वांना सहज शक्य आहे. ते केल्यास यश निश्चित मिळणार यात शंका नसावी. आहे ती परिस्थिती मान्य करून तिचा हसत खेळत स्वीकार करा, पुढच्या ध्येयाची आखणी करा व ध्येयपूर्तीसाठी लागणाऱ्या वेळेची निश्चिती करा. ध्येयासक्त होण्यासाठी लागणाऱ्या अभ्यासाची साधने एकत्रित करा. जेणेकरून तुमचे मन, बुद्धी तुम्ही निश्चित केलेल्या ध्येयाभोवती एकत्र होईल. 'कोळशाचा तुकडा प्रचंड दडपणाखाली सुद्धा चिकाटी सोडत नाही, म्हणूनच त्याचा हिरा होतो.' आपल्या ध्येयाशी चिकटून राहणारी माणसेच आपली स्वप्ने साकार करू शकतात. आव्हानात्मक परिस्थिती त्यांना अधिक प्रयत्न करण्यास उद्युक्त करते. या परिस्थितीशी सामना करण्याचे बळ आपणांस एसडी–सीड देण्याचा प्रयत्न करणार आहे हे मात्र निश्चित...!

आपल्या जीवनात सातत्याने घडत जाणारी बाब म्हणजे 'बदल'! या बदलानुसार जे स्वत:मध्ये बदल घडवितात तेच यशस्वी होतात, हा निसर्गाचा नियम आहे. ज्यांना बदलत्या काळाबरोबर बदलता आले नाही ते काळाच्या पडद्याआड जातात हा इतिहास आहे.

आज साक्षरतेचे प्रमाण खूप वाढले आहे. पदवी घेऊन बाहेर पडणारे खूप आहेत. त्यामानाने खाजगी व सरकारी नोकऱ्यांची संख्या खूप कमी आहे. आपली व्यवस्था या सगळ्यांना नोकऱ्या देऊ शकत नाही. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगार तरूणांची संख्या वाढते आहे. सरकारी नोकऱ्यांमधील कपातीचे धोरण, खाजगी कंपन्यांचे यांत्रिकीकरण व ऑटोमेशनचा वाढता प्रचार व प्रसार यामुळे नोकऱ्या स्वप्नवत झाल्या आहेत. अशा परिस्थितीत तरूणांनी नोकरी करण्यापेक्षा नोकरी देणारे बनण्याची गरज आहे. त्यासाठी त्यांनी उद्योजक बनणे हा एकच उपाय आहे.

तरूणांना उद्योजक बना, असे सांगितले तर त्यांच्यापुढे अनेक प्रश्न उभे राहतात. उदा. उद्योगासाठी जागा मिळेल का? त्यासाठी लागणारे भांडवल, गुंतवणूक, अनुभवी व तज्ञ मनुष्यबळ आणायचे कुठून? माझा उद्योग यशस्वी होईल का? जर अपयश आले तर लोक काय म्हणतील? इत्यादी इत्यादी. परंतु मित्रांनो, या सर्व भ्रामक कल्पना आहेत. त्यापासून स्वत:ला दूर ठेवा आणि आत्मविश्वासाने बदलत्या काळाला सामोरे जा. शासनाने अनेक योजना यासाठी अंमलात आणल्या आहेत, त्या समजून घ्या व त्यांचा लाभ घ्या. उद्योजक बनण्यासाठी उद्योजकीय मानसिकता, उद्योजकीय वैचारिकता व अर्थपूर्ण जोखीम लागते! ती मिळविण्यासाठी उद्योजकाने 'वैचारिक पात्रता' नक्कीच आत्मसात केली पाहिजे. हेच गुण उद्योगाच्या प्रगतीसाठी निर्णायक ठरतात.

आपण ज्या व्यवसायात उतरणार आहोत त्याचे परिपूर्ण ज्ञान घ्या. आपले ग्राहक कोण असतील, प्रतिस्पर्धी कोण आहेत, आपल्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध आहे का? याची माहिती घ्या. त्याचा कृती आराखडा तयार करा. ध्येयपूर्तीसाठी योजना आखा, प्राधान्यक्रम ठरवा, महत्वाच्या व्यक्ती कोण आहेत ते ओळखा व त्यांची मदत घ्या. If You dream it..... Then you can achieve it..! आपले ध्येय जोपर्यंत आपल्या अंतर्मनात रूजत नाही, तोपर्यंत आपण झपाट्याने कामाला लागत नाही.

शेवटी मी एकच सांगेन की, "आकाशी झेप घेरे पाखरा...! तोडी सोन्याचा पिंजरा...!! So Think Big... Think Fast...... Think Ahead....!

– श्री. जी.टी. महाजन

एसडी–सीड सल्लागार समिती सदस्य

| या अंकात... | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १. संपादकीय | २ |
| २. नवीन उद्योग कसा सुरू कराल? | ३ |
| ३. विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम | ४ |
| ४. जाणून घ्या आपली क्षमता | ५ |
| ५. इंग्रजीची भीती वाटते? | ६ |
| ६. सुट्टीतली नोकरी फायद्याची | ७ |
| ७. गुरूंची शिकवण | ८ |
| ८. लाभार्थ्यांचे मनोगत | ९ |

ज्ञानयज्ञ संपादक मंडळ

श्री. राजेश यावलकर – ज्ञानयज्ञ प्रमुख संपादक, श्री. एन.जे. गादिया, श्री. महेश गोरडे, श्री. नीळकंठराव गायकवाड, श्री. मिलींद कुलकर्णी, प्रा. एस.व्ही. सोमवंशी

# नवीन उद्योग कसा सुरू कराल?



आज साक्षरतेचे प्रमाण खूप वाढले आहे. पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करणारे बरेच आहेत, परंतु त्या तुलनेत त्यांना रोजगार मिळत नाही. या परिस्थितीवर मात करण्यासाठी 'जे होते ते चांगल्यासाठीच' या उक्तीप्रमाणे आपण नोकरी न करता उद्योजक बनू असा सकारात्मक विचार करायला हवा. आपल्यामधील गुणांचा व आवडीचा विचार करून व्यवसाय निवडला पाहिजे आणि तो यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम करायला हवेत. सुरूवातीला कोणत्याही क्षेत्रात आपल्याला काही आव्हानांना सामोरे जावे लागते, परंतु प्रत्येक आव्हानावर मात करण्यासाठी उपायदेखील असतात. त्यामुळे खचून न जाता ती आव्हाने स्वीकारून त्यावर मात करायला हवी. आज आपण काही प्रसिद्ध व नामांकित उद्योजक पाहिले तर त्यांचा सुरुवातीचा काळ खूपच खडतर होता, परंतु त्यावर त्यांनी मात केली. अशा उद्योजकांचा आदर्श आपण नेहमी समोर ठेवल्यास आणि जो व्यवसाय सुरू कराल त्याची योग्य आखणी केल्यास आपण निश्चितच उद्योजकीय क्षेत्रात यशस्वी होवू शकता.

## नवोदित उद्योजकांसाठी काही टिप्स

- तुमच्या हातात किती व कोणत्या प्रकारची साधनसंपत्ती आहे हे तुम्हाला माहिती असायला हवं. भांडवल ही सर्वात मोठी गोष्ट असते. कारण भांडवलावरच आपण कशा प्रकारचे, किती प्रकारचे आणि कोठे काम देऊ शकतो हे अवलंबून असते. म्हणजेच व्यवसायाची जागा, कामासाठी लागणारी माणसं, कंपनी नोंदणी, इत्यादी गोष्टी जोडलेल्या असतात.
- विविध ठिकाणी व्यवसायासाठी मिळणाऱ्या कर्ज सुविधांचा लाभ घ्या. वेळ आणि पैशांचे योग्य नियोजन करा. जेणेकरून पैसे हातात पडल्यावर त्याचे योग्य पद्धतीत मूल्यमापन होईल.
- स्वत:मधील गुण ओळखा.
- स्वत:चा कृती आराखडा तयार करा. जेणेकरून प्रत्यक्ष कार्यवाही करताना त्याचा तुम्हाला फायदा होईल.
- इतरांच्या कल्पना चोरू नका. नवं आणि आकर्षक काहीतरी आपल्या ग्राहकाला देणे ही आपली जबाबदारी समजा. दुसऱ्यापेक्षा तुम्ही काहीतरी वेगळं द्यायला हवं.
- आपल्या उत्पादन अथवा सेवेचं मार्केट समजून घ्या. तुमच्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षा मार्केटमध्ये तुमचं उत्पादन हे ग्राहकांना आकर्षून घेण्यास यशस्वी ठरलं पाहिजे.
- स्वत:च्या उत्पादनाचं टार्गेट कस्टमर ओळखून स्वत:च्या उत्पादनाची नियोजनबद्ध आणि परिणामकारक मार्केटिंग करा. त्याशिवाय बदलत्या मार्केटनुसार स्वत:ला अपडेट ठेवा. आपल्या उत्पादन अथवा सेवेचा विचार करत असताना पहिल्या दिवसापासूनच त्याच्या ब्रॅण्डींगचा विचार करायला सुरूवात करा.

## SWOT Analysis : उद्योजक आणि उद्योगाची कुंडली

SWOT Analysis ही तुमची व्यावसायिक गरज आहे. SWOT Analysis म्हणजे आपल्या व्यवसायाच्या Strength आणि Weakness यांचे परीक्षण. आपल्या व्यवसायातील नवनवीन संधी आणि संभाव्य धोके यांचे परीक्षण

'स्वॉट' परीक्षण हा तुमच्या उद्योगाची एक परिपूर्ण अशी कुंडली आहे. हे परीक्षण तुम्हाला तुमच्या उद्योगाशी निगडीत सर्व बारकावे ओळखण्यास नक्कीच मदत करतं.

आपल्या उद्योगाचे स्वॉट परीक्षण करण्यामागचा हेतू तुम्हाला तुमचे उद्योजकीय धोरण निश्चित करता यावे हा आहे. आजच्या या अत्याधुनिक युगात 'धोरण' हा शब्द प्रत्येक व्यवसायाशी निगडित आहे. आजच्या या कॉर्पोरेट युगात 'धोरण' ही उद्योगाची अशी एक बाजू आहे की, याशिवाय प्रगतीची कास धरता येणे शक्य नाही. प्रत्येक उद्योजकाने याबद्दल प्रामुख्याने विचार करायला हवा. उद्योगधंद्यामधील स्पर्धा पाहता उद्योजक या स्पर्धेकडे कोणत्या दृष्टीने पाहतो आहे हेही तितकेच महत्त्वाचे असते.

कंपनीचे धोरण ठरवताना स्वॉट परीक्षणात प्रमुख स्रोत मानला जातो. S-W-O-T स्वॉट म्हणजे S = Strength, W = Weakness, O = Opportunities आणि T = Threats.

**Strength** म्हणजे तुमची **शक्तिस्थानं** ज्यात तुमची व्यावसायिक क्षमता, तुमच्या व्यवसायाची जमेची बाजू, व्यवसायाशी संलग्नित संसाधने, व्यवसायाची संपत्ती, भांडवल, ग्राहक, तंत्रज्ञान, पेटंट, व्यवसायातील स्पर्धेशी तुमच्याकडील फायदे, R&D गुणवत्ता, मनुष्यबळ इत्यादी गोष्टी येतात.

**Weakness कमतरता**: व्यवसायाशी निगडीत दोष, दुर्बल घटक ज्यामुळे तुमचा व्यवसाय स्पर्धेत मागे पडत आहे, कुठल्या घटकामुळे व्यवसाय स्पर्धेत टिकू शकत नाही, कुठल्या घटकात सुधारणा करता येवू शकते की, ज्यामुळे तुमच्या व्यवसायातील स्पर्धक पुढे आहेत, कुठे काय टाळता येवू शकेल, इत्यादी गोष्टी येतात.

**Opportunities संधी**: तुमच्या व्यवसायास पूरक (extra factors) आहेत, व्यवसायाशी निगडीत कोणत्या संधी बाजारात आहेत. उदा. जर तुम्ही एखादी वस्तू उत्पादन करत असाल, तर त्याच्याशी निगडीत काही नवीन उत्पादन करता येवू शकेल का? नवीन ट्रेन्ड कॅप्चर करता येईल का? नवीन बाजारपेठ हस्तगत करता येईल का? प्रासंगिक मागणीचा लाभ घेता येऊ शकेल का? या सर्व गोष्टी येतात.

बाजारपेठेत संधी ही नेहमीच उपलब्ध असते. संधी ही विविध कारणांमुळे उपलब्ध होवू शकते. जसे की, बाजारपेठेतील बदल, ग्राहकांच्या बदलत्या गरजा, तंत्रज्ञानातील बदल, नवीन उत्पादन पद्धती, व्यवसायवाढीची संधी ही तुमच्या दुर्बल घटकांवर केलेल्या उपायांमुळेही उपलब्ध होऊ शकते.

**Threats धोका**: धोका ही व्यवसायातील लंगडी बाजू बनू शकते. Threats वर तुमचा फार कमी किंवा शक्यतो कमी ताबा असू शकेल, पण तुम्ही आपल्या व्यवसायातील संभाव्य धोके नक्कीच ओळखून त्यावर आपत्कालीन नियोजन करू शकता. स्पर्धेमुळे वस्तुदर कमी होणे, तंत्रज्ञान कालबाह्य होणे, ग्राहकांच्या गरजा बदलणे असे एक ना अनेक प्रकारणे धोके उद्योगात येऊ शकतात.

# एसडी–सीडतर्फे उद्योजकता विकास शिबीराचे आयोजन

विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण होऊन त्यांना नोकरी, व्यवसाय, रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने एसडी–सीडतर्फे दोन दिवसीय उद्योजकता विकास शिबीराचे कॉलेज ऑफ इंजिनीअरींग, नॉर्थ महाराष्ट्र नॉलेज सीटी, जळगाव येथे आयोजन करण्यात आले.

या शिबीरात जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्रातील तज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना नवउद्योजक होण्यासाठी विविध शासकीय योजनांची माहिती, सरकारी व निमसरकारी कर्ज व अनुदान योजना, लघु उद्योगी नोंदणी इत्यादी माहिती दिली. तसेच जिल्ह्यातील यशस्वी उद्योजकांसोबत विद्यार्थ्यांना संवाद साधता आला. ज्याद्वारे त्यांना उद्योजकांकडून बहुमुल्य व्यावसायिक मार्गदर्शन मिळाले. त्यात विविध उद्योग संधी व त्यांचे सखोल ज्ञान, ध्येय निश्चिती, व्यक्तिमत्व विकास, सुसंवाद कौशल्य, उत्पादनांची माहिती व बाजारपेठ पाहणी, इत्यादी बाबींवर मार्गदर्शन मिळाले. एकूण १०५ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. कार्यशाळा संपल्यानंतर काही विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया जाणून घेतली असता आम्हाला असे आढळले की, बरेच विद्यार्थी उद्योजकतेकडे वळण्यास प्रेरित झाले आहेत आणि स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास इच्छित आहेत.






वरील शिबीराव्यतिरिक्त एसडी–सीडने विद्यार्थीहिताच्या इतर विविध विषयांवर एकूण २२ प्रशिक्षण कार्यक्रम राबविले, त्यात २७०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

## करिअर मार्गदर्शन



## स्मृती आणि एकाग्रता विकास



## परीक्षेला सामोरे जाताना



## मुलाखत कौशल्य




## वैयक्तिक समुपदेशन



## विविध कौशल्य विकास



# करिअर निवडीसाठी जाणून घ्या तुमची क्षमता



करिअर निवडण्यासाठी अनेकदा मानसशास्त्रीय चाचण्यांचा आधार घेतला जातो. या मानसशास्त्रीय चाचण्यांच्या निष्कर्षांवर अनेकदा प्रश्न उपस्थित होतात. या मानसशास्त्रीय चाचण्यांचं स्वरूप मुळातून समजून घेणं महत्त्वाचं आहे. त्यामुळे विद्यार्थी व पालकांच्या मनातील संभ्रम कमी होईल.

करिअर निवडण्यासाठी घेण्यात येणाऱ्या मानसशास्त्रीय चाचण्यांमध्ये चार विभाग पडतात. या चाचण्यांना ॲप्टिट्यूड टेस्ट असं संबोधलं जात असलं तरी यामध्ये अभिरूची (इंटरेस्ट) चाचणी, बुद्धिमापन (इंटेलिजन्स) चाचणी, अभिक्षमता (ॲप्टिट्यूड) चाचणी व व्यक्तिमत्त्व (पर्सनॅलिटी) चाचणी आदींचा समावेश होतो.

विद्यार्थ्यांना कोणत्या व्यवसायाबाबत आवड आहे, हे यामधून जोखलं जातं. या व्यवसायांसंबंधित प्रश्न या चाचणीमध्ये असतात. अनेकदा विद्यार्थ्यांची आवड कालानुरूप बदलत जाते. काही क्षेत्रांबाबत त्यांना माहिती नसते, अशा वेळेस त्याविषयी आवड असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे या चाचणीद्वारे चाचणीच्या वेळच्या अभिरूचीचा अंदाज येवू शकतो.

### अभिक्षमता चाचणी

विविध व्यवसायांना लागणाऱ्या क्षमतांनुसार या चाचण्या तयार केलेल्या असतात. या चाचणीद्वारे विद्यार्थी कोणत्या व्यवसायात अधिक यशस्वी होईल, हे सूचित केलं जातं. क्लिनिकल सायकोलॉजिस्टकडून यासाठी 'डिफरन्शियल ॲप्टिट्यूड टेस्ट' वापरली जाते. तर राज्य सरकारच्या व्यवसाय निवड व प्रशिक्षण मंडळातून प्रशिक्षण घेतलेल्या शिक्षकांकडून नाफडे यांची जनरल ॲप्टिट्यूड टेस्ट बॅटरीही वापरण्यात येते. नाफडे यांनी भारतीय मानकांनुसार या टेस्टची रचना केली आहे. त्यामुळे ही टेस्ट अधिक लोकप्रिय आहे. खालील चाचण्या या जनरल ॲप्टिट्यूड टेस्टमध्ये घेतल्या जातात.

- **नेम कम्पॅरिझन** – या चाचणीद्वारे क्लेरीकल कामासाठीचा वेग व अचूकता मोजण्याचं काम केलं जातं.
- **अरिथमॅटिक कॉम्प्युटेशन** – जलद व अचूक आकडेमोड करण्याचं कसब यामध्ये अजमावलं जातं.
- **थ्री डायमेन्शनल स्पेस** – यामध्ये आर्किटेक्चर, फॅशन डिझाइन, इंटिरियर डिझाइन, फाईन आर्टस्‌सारख्या सृजनशील क्षेत्रात लागणारी अवकाशीय (spatial) क्षमता जोखण्याचं काम केलं जातं.
- **टूल मॅचिंग** – यामधून विद्यार्थ्यांची तांत्रिक व यांत्रिकी क्षमता तपासण्याचं काम केलं जातं. यामधून एकाग्रता व निरीक्षण क्षमतेचाही अंदाज येतो.
- **अरिथमॅटिस रिझनिंग** – गणितीय संकल्पनांबाबत यामधून अंदाज घेता येतो. अभियांत्रिकी वा विज्ञान संशोधन या क्षेत्र निवडीसाठी या चाचणीचा उपयोग होतो.
- **फॉर्म मॅचिंग** – विविध आकार, त्यांची जोडणी यासंबंधीचं परीक्षण या चाचणीद्वारे केलं जातं. वैद्यकीय वा सृजनशील क्षेत्राच्या निवडीसाठी या चाचणीचा उपयोग होतो.
- **नॉन व्हर्बल रिझनिंग** – तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता या चाचणीद्वारे जोखली जाते.
- **व्होकॅबलरी इन मराठी/इंग्रजी** – भाषिक क्षमता तपासण्याचं काम या चाचणीद्वारे केलं जातं.

वरील चाचण्यांवरून विद्यार्थी नेमका कुठल्या क्षेत्रात करिअर करू शकेल, हे ओळखलं जातं. क्षेत्र निश्चितीनंतर त्या विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेनुसार अभ्यासक्रम निवडला पाहिजे. उदा. मेकॅनिकल क्षमता आहे, परंतु बुद्धिमत्ता कमी असेल तर अभियांत्रिकीचा पर्याय निवडण्यापेक्षा आय.टी.आय. वा अन्य अल्पमुदतीचा तांत्रिक अभ्यासक्रम निवडणं योग्य राहील.

# इंग्रजीची भीती वाटते?



आज इंग्रजी भाषेचा वापर सर्रास होतो. म्हणूनच या भाषेला 'वर्ल्ड लॅंग्वेज' म्हणजे जागतिक भाषा असं म्हटलं जातं. जगाच्या कानाकोपऱ्यात इंग्रजी भाषा बोलणारे लोक आढळून येतात आणि त्यामुळेच विविध देशातील माणसांना एकमेकांशी जोडून ठेवणारी भाषा म्हणून इंग्रजी भाषेकडे पाहिलं जातं. भाषांचा अडसर दूर सारत जगभरातील लोकांना एकमेकांशी जोडण्याचं काम इंग्रजी भाषा करते. तरीही जे विद्यार्थी इंग्रजी भाषा बोलू शकत नाहीत किंवा ज्यांना या भाषेत संवाद साधणं कठीण होतं, त्यांच्या मनात या भाषेविषयी बरेच गैरसमज असल्याचं दिसून येतं. हेच गैरसमज त्यांना ही भाषा शिकण्यापासून रोखत असतात. ही भाषा शिकण्या आणि बोलण्याविषयी काय काय गैरसमज विद्यार्थ्यांमध्ये आहेत, ते आपण पाहूया:

### गैरसमज १ — इंग्रजी भाषा शिकायला खूप कठीण आहे

**तथ्य** — 'इंग्रजी भाषा शिकायला खूप कठीण आहे', हा सगळ्यात मोठा गैरसमज लोकांनी पसरवलेला आहे. इतर कोणत्याही भाषेतील अक्षरापेक्षा इंग्रजी अक्षरे म्हणजे अल्फाबेट सगळ्यात सोपी आहेत. इंग्रजी भाषेत केवळ २६ मुळाक्षरं असून ती खूपच सुलभ रीतीने वापरली जातात. याचाच अर्थ, त्यात कोणतीही जोडाक्षरं किंवा विविधता नाही. इतर भाषेतील व्याकरणातील नियमांपेक्षा ते सुकर आहेत.

### गैरसमज २ — इंग्रजी बोलता येत नसेल तर चांगली नोकरी मिळणार नाही

**तथ्य** — प्रभावीरित्या सगळ्यांबरोबर संवाद साधण्यासाठी इंग्रजी भाषा येणं आवश्यक असलं तरी तुमची गुणवत्ता जोखण्यासाठी केवळ हेच एक परिमाण नाही. तुमची गुणवत्ता, बुद्धी, क्षमता, शिक्षण ह्या गोष्टीदेखील महत्त्वाच्या आहेत, पण प्रभावीरित्या इंग्रजीमध्ये संवाद साधता येणं, हा नेहमीच एक अतिरिक्त फायदेशीर गुण ठरतो.

### गैरसमज ३ — माझ्या खूप चुका होतात / मी खूप चुका करतो, म्हणून मी इंग्रजी शिकणार नाही

**तथ्य** — सुरूवातीला कोणतीही भाषा शिकताना चुका होणं साहजिकच आहे. त्यामुळे सूक्ष्मदर्शकाखाली कोणत्याही चुका शोधायला जावू नका किंवा त्यांचं विश्लेषण करत बसू नका. सुरूवातीला तुमच्या चुका होणार, हे वास्तव लक्षात ठेवा आणि अशा चुका सुरूवातीला होवू द्या. अशा चुका टाळण्यासाठी सर्वसाधारणपणे व वरचेवर वापरले जाणारे शब्द आधी शिकून घ्या. इंग्रजीमधील लेख/बातम्या/पुस्तक/वर्तमानपत्र/मासिक वाचायला सुरूवात करा. इंग्रजीमध्ये संवाद साधताना किंवा बोलताना तुम्हाला माहीत असणारे सोपे–सोपे शब्द वापरा, पण आत्मविश्वासाने.

### गैरसमज ४ — ॲक्सेंटमध्ये बोलतो तेव्हाच योग्य इंग्रजी बोलतो

**तथ्य** — नैसर्गिक उच्चार म्हणजेच ॲक्सेंट नेहमीच बेस्ट असतो! इंग्रजी भाषा आता आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून वापरली जाते. वेगवेगळ्या समाजातून, सांस्कृतिक तसंच भौगोलिक परिस्थितीतून आलेल्या लोकांचे इंग्रजी भाषेचे उच्चार वेगवेगळे असणार, हे वास्तव आता जगभरातील लोकांनी स्वीकारलं आहे, मान्य केलं आहे. त्यामुळे आपल्याला इंग्रजी बोलता येतं, हे दाखवण्यासाठी उगीचच खोटा खोटा ब्रिटिश, अमेरिकन किंवा ऑस्ट्रेलियन ॲक्सेंट आपलासा करण्याची गरज नाही.

### इंग्लिश स्पिकिंग कौशल्य सुधारण्यासाठी काय करता येईल?

- ★ आपल्या चुकांची काळजी करू नका. सुरूवातीला नव्यानं ही भाषा शिकताना चुका या होणारच.
- ★ संयम राखा. इंग्रजी शिकणं केवळ एका दिवसात तर शक्य नाही.
- ★ आत्मविश्वास येईपर्यंत छोट्या–छोट्या आणि सोप्या वाक्यांचा आधार घ्या.
- ★ उत्तम इंग्रजी येणारी व्यक्तीच्या इंग्रजी उच्चाराची शैली कशी आहे, तसंच ही व्यक्ती वाक्यरचना कशी करते याचं निरीक्षण करा.
- ★ आपल्या चुका ओळखून त्या दुरूस्त करण्यासाठी तुम्हाला मदत करू शकणाऱ्या मित्रमैत्रिणी, नातेवाईक किंवा ओळखीच्या व्यक्तीची मदत घ्या.
- ★ इंग्रजी बोलण्याचा सराव आवश्यक असल्यानं गरज भासल्यास स्वत:शीच मोठ्यानं बोलत रहा.
- ★ दररोज एकतरी नवीन शब्द शिका आणि आपल्या संवादात किंवा बोलण्यात त्याचा वापर करा.
- ★ दररोज तुमच्या आवडीच्या विषयाप्रमाणे एकतरी इंग्रजी लेख मोठ्यानं वाचा.
- ★ इंग्रजी पुस्तक आणि मासिक वाचा.
- ★ बरोबर एक पॉकेट डिक्शनरीही सतत आपल्यासोबत असू दे. नवीन शब्द ऐकल्यास, वाचल्यास तात्काळ हा शब्द डिक्शनरीमध्ये पाहून समजून घेता येईल.

# सुट्टीतली नोकरी फायद्याची




सुट्टीच्या काळात विद्यार्थ्यांनी नोकरी करण्याचं प्रमाण आपल्याकडे अजूनही कमी आहे. हे 'समर जॉब्स' खरं तर तुमच्या करिअरच्या वाटचालीत खूप फायद्याचे ठरू शकतात. या निमित्तानं आपलं कुटुंब, मित्रमंडळी या पलीकडच्या व्यावसायिक जगाची तोंडओळख होते. शिवाय, स्वकमाईचा आनंद मिळतो तो निराळाच...

परीक्षा संपल्यानंतर काय–काय करायचं याचे प्लॅन्स परीक्षेपूर्वीच आखले जातात. या प्लॅन्समध्ये सुट्टीच्या २–३ महिन्यात एखादी तात्पुरती किंवा अर्धवेळ नोकरी असं मात्र फार कमी जण करतात. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिकट असेल तर अपरिहार्यता म्हणून नोकरी करणारे असतात. मात्र तशी अपरिहार्यता नसताना सुट्टीमध्ये नोकरी शोधणारे फारच कमी. परदेशात मात्र 'समर जॉब्स' तरूणांमध्ये लोकप्रिय आहेत. सुट्ट्यांमध्ये पिझ्झा शॉप्समध्ये वगैरे काम करणं तिथे सर्रास दिसतं. त्यातून मिळणाऱ्या पैशांमधून पुढील शिक्षण अथवा आपल्याला हव्या त्या वस्तूची खरेदी शक्य होते.

भारतात मात्र असं चित्र दिसत नाही. आपल्याकडे आजही मुलांचं शिक्षण ही पालकांची जबाबदारी समजली जाते. आपल्या मुलांनी उन्हाळी सुट्टीत नोकरी करणे हे अनेक पालकांना रूचत नाही. त्याऐवजी मुलाना छंदवर्गांना पाठवणं, सहलीला पाठवणं हे पालकांना योग्य वाटतं. मात्र सुट्टीमध्ये एखादी लहानशी नोकरी किंवा काम मुलांना करू देणं हे त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात फार मोठी भूमिका बजावू शकते हे पालकांनी लक्षात घ्यायला हवं. अशा प्रकारच्या 'समर जॉब्स'चे अनेक फायदे होतात. जसे –

- **वास्तव जगाशी ओळख**

  नोकरीच्या निमित्तानं कुटुंब व मित्रपरिवार यांच्या पलीकडच्या भिन्न जगाशी ओळख होते. कुटुंबात त्यांना सुरक्षित वाटत असतं. आपल्यातले दोष, उणीवा याकडे कुटुंबातले सर्वजण प्रेमाखातर दुर्लक्ष करत असतात. मानवी स्वभावाचे अनेक नमुने या निमित्तानं पाहायला मिळतात. दुसऱ्याच्या स्वभावाचा अंदाज घेवून त्याच्याशी वागावं कसं याचे धडे मिळतात.

- **भिन्न वयोगटाशी संपर्क**

  आपल्या बरोबरीच्या मित्र–मैत्रिणींशी मुलांचा अधिक संबंध येत असतो. मात्र नोकरीच्या निमित्तानं आपल्याहून अधिक वयाच्या व्यक्तींबरोबर वावरण्याची, काम करण्याची संधी मिळते. त्यांचे प्रश्न, त्यांचा जीवनविषयक दृष्टीकोन यातून मुलांच्या व्यक्तिमत्वात आवश्यक प्रौढपण येते.

- **स्वकमाई**

  मुलांच्या सर्व गरजा पालक पुरवत असतात. काही वेळा चैनीच्या गोष्टीही पालक मुलांना आणून देतात. पण त्यासाठी लागणारा पैसा मिळवण्यासाठी किती कष्ट घ्यावे लागतात हे नोकरीच्या निमित्तानं कळतं. स्वकमाईतून मिळणाऱ्या आनंदाचा अनुभव मुलांना घेता येतो. आपल्या पैशांनी स्वत:साठी किंवा कुटुंबासाठी एखादी वस्तू घेताना किती समाधान मिळतं हे मुलांना अनुभवता येतं. हे समाधान एखाद्या आयत्या मिळालेल्या वस्तूपेक्षा कित्येक पटीनं अधिक मोलाचं असतं.

- **शिक्षणाला अनुभवाची जोड**

  शाळा–कॉलेजात मिळणारं शिक्षण हे सैद्धांतिक असतं. त्याचा प्रत्यक्षात कसा उपयोग करायचा हे अशा छोट्या कामांद्वारे कळतं. उदाहरणार्थ कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना पुस्तकातल्या किंवा प्रश्नपत्रिकेतल्या प्रश्नांवरून जमा–खर्चाच्या नोंदी करता येतात. पण प्रत्यक्षात हिशेब लिहिताना किती गोष्टींचं भान ठेवावं लागतं किंवा कॉलेजमध्ये न शिकवलेला एखादा प्रत्यक्षातला आर्थिक व्यवहार नोंदवहीत कसा लिहायचा याचा प्रत्यक्ष अनुभव कॉमर्सच्या विद्यार्थ्याला त्याविषयाचा वेगळा पैलू दाखवून देतो.

  सिद्धांत व अनुभव यांची प्रत्यक्ष सांगड घालण्यासाठी इंजिनीअरिंग, व्यवस्थापन, मीडिया याविषयी अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टीत आर्टिकलशिप करणं सक्तीचं असतं. अभ्यासक्रमाचा भाग म्हणून जिंगल्स तयार करणं ॲडव्हर्टायझिंगच्या विद्यार्थ्यांना जमतं. पण समर जॉबमध्ये एखाद्या ॲड एजन्सीमध्ये डेडलाईन्सच्या तणावाखाली राहत अशा जिंगल्स बनवणं यातून विद्यार्थ्यांना त्या क्षेत्रातलं वास्तव कळतं.

- **करिअर निवडीमध्ये मार्गदर्शक**


  दहावी–बारावीनंतर विद्यार्थी जो अभ्यासक्रम निवडतात त्यामागे फार विचार केलेला असतो असं अभावानंच दिसतं. आपली खरी आवड काय आहे याचा विचार केलेलाच नसतो. उन्हाळी सुट्टीमधील नोकरीतून एखादे करिअर 'क्लिक' होवू शकते. उदाहरणार्थ कॉलेजमध्ये काहीशा अबोल असणाऱ्या एका विद्यार्थिनीनं अनाथ मुलांसाठी कार्यरत असणाऱ्या एका स्वयंसेवी संस्थेत दोन महिन्यांसाठी नोकरी केली. या मुलांना गणित व इंग्रजी शिकवण्याचे काम केले. या कामातून तिला इतका आनंद मिळाला की तिने पदवीनंतर समाजसेवेत पदव्युतर शिक्षण (M.S.W.) घेतलं व एका स्वयंसेवी संस्थेत अधिकारी स्तरावर ती कार्यरत आहे. त्यामुळे एक छोटीशी अल्पकालीन नोकरी पुढील जीवनाला दिशा देणारी ठरू शकते.

- **स्थायी नोकरी किंवा पुढील अभ्यासक्रमांसाठी उपयुक्त**

  खासगी बँका किंवा आस्थापनांमध्ये सातत्याने नोकरभरती होत असते. सुट्टीमधील चांगल्या प्रकाराच्या कामाने कायमस्वरूपी नोकरीही मिळू शकते.

  शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीसाठी अर्ज करताना हा छोटासा अनुभव महत्वपूर्ण ठरू शकतो.

# रविंद्रनाथ टागोर (१८६१–१९४१)



## परिचय

टागोर एक बंगाली कवी, कादंबरीकार आणि चित्रकार होते.
१९१३ मध्ये त्यांना साहित्यातील नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.
आंतरराष्ट्रीय सहकार्याचा प्रसार आणि जागतिक नागरिकांसोबत सलोखा करण्याच्या उद्देशाने शिक्षण प्रणाली तयार करण्याची त्यांची कल्पना होती.

### टागोर यांनी स्थापन केलेल्या संस्थेची उद्दिष्टे

- व्यक्तीची स्वपूर्तता आणि त्याचे आध्यात्मिक ज्ञान यावर त्याचे व्यक्तिमत्व अवलंबून असते.
- मुलांना त्यांच्या स्वत:च्या शिक्षणाचा मार्ग स्वीकारण्याचे स्वातंत्र्य दिले तर त्यांचा सर्वांगीण विकास होतो.
- योग, खेळ, क्रीडा हे शिक्षणाचे अविभाज्य भाग आहेत, त्या माध्यमातून ते निरोगी राहतात.
- आंतरराष्ट्रीय समज आणि सार्वत्रिक बंधुत्वासाठी शिक्षण महत्वाचे आहे.
- शिक्षण ही मनुष्य–निर्मिती प्रक्रिया आहे, जी माणसांमध्ये अस्तित्वात असलेल्या नैसर्गिक शक्तीचा शोध लावते.

### गरज

- टागोर यांनी केलेली शैक्षणिक कल्पना व्यक्तीच्या आजूबाजूच्या परिसरात खोलवर रूजली आहे, परंतु जगाच्या संस्कृतीशी निगडीत आहे.
- त्यांना असे वाटते की वनस्पती आणि पशु यांच्यातील लवचिकता व होणाऱ्या हंगामी बदलांचे उत्स्फूर्त कौतुक करण्यासाठी अभ्यासक्रमात झाडांच्या खाली मोकळ्या हवेत असलेल्या वर्गासह निसर्गाच्या सभोवतालच्या परिस्थितीची रचना करणे आवश्यक आहे.
- मुले झाडाखाली चटईवर बसले आहेत आणि त्यांना वर्गात झाडावर चढण्याची परवानगी आहे. निसर्ग भ्रमण आणि फेरफटका हे अभ्यासक्रमाचा एक भाग आहेत.
- वर्गाच्या वेळापत्रकात हवामानाप्रमाणे बदल करण्याची किंवा नैसर्गिक घटना आणि मोसमी सणांना विशेष लक्ष देण्याची परवानगी देण्यात आली पाहिजे.

### उपाय

**वरील गोष्टी विविध शिक्षण पद्धती वापरून साध्य करता येवू शकतात, जसे की:**

**१. फिरणे आणि सहलीच्या माध्यमातून शिकणे**

टागोर यांना विश्वास होता की, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र आणि इतर सामाजिक विज्ञान यांसारखे विषय परिणामकारक जागांवर फिरून व तिथे सहल काढून शिकवले जावू शकतात. याद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवासोबत असंख्य गोष्टी बघायला मिळतील तसेच खूप ज्ञान प्राप्त करण्याची संधी प्राप्त होईल.

**२. उपक्रमांमधून शिकणे**

दुसरे म्हणजे उपक्रमांमधून शिकण्याचा समावेश करून टागोर यांनी सांगितले आहे की मुलांच्या शरीराचा आणि मनाचा विकास होण्यासाठी उपक्रमांच्या माध्यमातून शिकणे आवश्यक आहे. म्हणूनच त्यांनी शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये झाडे, नाटक, उड्या मारणे, फळे तोडणे, नृत्य इत्यादींसारख्या उपक्रमांचा समावेश केला.

**३. कथन–वजा–चर्चा आणि वादविवाद पद्धत**

विद्यार्थ्यांचे वक्तृत्व कौशल्य विकसित करण्यासाठी टागोर यांच्या शिक्षण केंद्रात कथा–वजा–चर्चा आणि वादविवाद करणे यांचे आयोजन करण्यात आले होते. तर्कसंगत चर्चा आणि सखोल चर्चेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले.

**४. शोधक पद्धती**

टागोर यांनी त्यांच्या शैक्षणिक संस्थेत शिकविण्याची एक महत्वाची पद्धत म्हणून संशोधनात्मक पद्धत सुरू केली. प्रथम विद्यार्थ्यांना विषयाबद्दल त्यांच्या शंका स्पष्ट करण्यासाठी प्रश्न विचारले जातात आणि शिक्षक त्यांच्या योग्य उत्तराद्वारे त्यांना समाधान करण्याचा प्रयत्न करतात. नंतर वर्गामध्ये चर्चा केलेला विषय विद्यार्थ्यांना किती समजला याचे मूल्यांकन करण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांना प्रश्न विचारतात.

### फायदे

- शालेय शिक्षणाच्या वातावरणातून बाहेर येणारे विद्यार्थी निसर्गाच्या आणि त्यांच्या संस्कृतीच्या सान्निध्यात राहतात.
- टागोर यांच्या संस्थेत त्यांच्या शैक्षणिक प्रयोगांद्वारे जगभरात एक शिक्षणपद्धतीची ऑफर दिली होती, जी आधुनिक जीवनशैलीशी सुसंगत आहे आणि आधुनिक काळातील शिक्षणाची गरज पूर्ण करते.

### तात्पर्य

- रविंद्रनाथ टागोर यांनी शांतीनिकेतनमध्ये एक आदर्श अनुभवात्मक शिक्षण संस्था विकसित केली आहे.
- आध्यात्मिक शिक्षणाचे ते एक महान अभिवक्ता होते. तसेच मानसिक, सामाजिक आणि भावनिक वाढीवर जोर देऊन त्यांनी मुलांच्या सुसंवादी विकासावर भर दिला.
- आधुनिक भारतीय नवनिर्मितीचे ते एक महान नबी प्रणेते होते, ज्यांनी शिक्षणाद्वारे बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

## आमची उद्दिष्टे

ज्ञानयज्ञ

* सर्व पात्र विद्यार्थ्यांना 21व्या शतकातील भारताच्या विकासात सहभागी होण्याची संधी प्राप्त करून देणे.
* विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व आणि परिणामाबद्दल प्रबोधन करणे.
* सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक व उद्योजकीय ध्येय गाठण्यासाठी आर्थिक मदत करणे.
* विद्यार्थी, पालक व शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी नवनवीन उपक्रम विकसित करून ते अंमलात आणणे.
* सर्व उपक्रमांना स्वयंपूर्ण बनवणे, ज्यायोगे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळेल.

## लाभार्थ्यांचे एसडी-सीडबद्दलचे मत...



**शेख खातिजा बानो रहीम, जळगाव – B.E. Civil (Third Year)**

सर्वप्रथम एसडी–सीडमार्फत दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेचे मी मनापासून आभार मानते. कारण जेव्हा जेव्हा आपल्यावर संकटे येतात आणि जो काही आपला संघर्ष सुरू असतो तेव्हा देव ती संकटे निवारण्यासाठी कोणाला तरी आपली मदत करायला पाठवित असतो आणि त्याचेच एक जिवंत उदाहरण म्हणजे मा. सुरेशदादा जैन.

मी लहान असतांनाच वडीलांचे छत्र हरविले. एका मुस्लिम कुटुंबातील असल्यामुळे मुलींना अनेक बंधनांमध्ये रहावे लागते. आम्ही दोघी बहिणी आणि आई असा आमचा परिवार. समाजाच्या भीतीने मुलींनी उच्चशिक्षण घ्यावे की नाही असा प्रश्न तिच्या मनात सतत घोंघावत असे. पण अशा बिकटवेळी आईने आम्हाला शिकविण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी आर्थिक अडचणींचा संघर्ष करत असतानाच मला एसडी–सीडकडून शिष्यवृत्ती मिळाली. यामुळे आता कोणत्याही आर्थिक अडचणींची मला भीती वाटत नाही आणि चांगला अभ्यास करण्यासाठी प्रेरणा मिळत आहे.



**पाटील रविन्द्र निंबा, धरणगाव – B.E. Mechanical (Fourth Year)**

मला सांगतांना अतिशय आनंद होत आहे की, मागील सहा वर्षापासून मला अखंडपणे एसडी–सीड शिष्यवृत्ती मिळत आहे. माझी घरची परिस्थिती फारच हलाखीची आहे. माझे वडील शेतमजूर आहेत. परिस्थिती जेमतेम आहे पण अशा वेळेस मला मी पाहिलेले इंजिनिअर होण्याचे स्वप्न आता पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे आणि हे सर्व शक्य झाले ते एसडी–सीडमुळेच.

मा. सुरेशदादांनी सुरू केलेले हे कार्य खूपच महान आहे, ज्याची इतर कोणत्याही कार्याशी तुलना होवू शकत नाही. दादांनी माझ्यासारख्या हजारो मुलांना दिलेली साथ अशीच राहो, अशी मी त्यांना विनंती करतो. दादांना उदंड आयुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना करतो.



**महाजन प्रियंका मधुकर – चोपडा – Java Programming**

मला मागील सात वर्षापासून एसडी–सीड शिष्यवृत्ती मिळत आहे. वडील शेतमजूर तर आई गृहीणी आहे. खेडेगावातील असल्यामुळे मुलींनी जास्त शिकू नये असे बाळकडू नेहमीच पाजले जायचे. पण शिकण्याची जिद्द होती. आई–वडील अशिक्षित होते, परंतू शिक्षणाचे महत्त्व जाणून होते. त्यांनी मला दहावीनंतर पुढे शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. पुढील शिक्षणासाठी लागणारा खर्च एसडी–सीडच्या शिष्यवृत्तीच्या मदतीने सोडविला गेला. पुस्तके, वह्या इ. स्टेशनरीही मला सवलतीच्या दरात एसडी–सीडच्या माध्यमातून मिळत गेल्या. आज मी एक खेड्यातील मुलगी हैद्राबाद येथील प्रख्यात सत्या टेक्नोलॉजी येथे शिक्षण घेत आहे आणि हे सर्व शक्य झाले ते एसडी–सीडचे मला सात वर्ष पाठबळ मिळाल्यामुळे.

मा. दादांचे मी शतशः ऋणात राहू इच्छिते, देव त्यांना नेहमी विद्यार्थ्यांची मदत करण्यासाठी सशक्त आणि दिर्घायुष्य देवो, अशी प्रार्थना करते.



**पाटील पंकज राजेंद्र – पाचोरा – B.E. Instrumentation (Fourth Year)**

बीईच्या शेवटच्या वर्षात मी शिकत आहे. एक लहानशा खेडेगावातून आलेलो शेतकरी कुटुंबातील मी विद्यार्थी आहे. उच्च शिक्षणाबद्दल मला काही जास्त माहिती नव्हती आणि गावातील वातावरणही शिक्षणासाठी पोषक नव्हते. घरची परिस्थितीही जेमतेम. अशा परिस्थितीत दहावी पास झाल्यानंतर व्यावसायिक शिक्षण घ्यावे तर आर्थिक अडचण समोर होती, परंतु एसडी–सीडच्या शिष्यवृत्ती मदतीमुळे मी डिप्लोमाला प्रवेश घेतला आणि आजपर्यंत मला एसडी–सीडच्या शिष्यवृत्तीचा लाभ मिळत आहे. शिक्षण सुरू असतांना वडीलांचे निधन झाले पण एसडी–सीडच्या माध्यमातून मा. दादांचा आजही वडीलरूपी हात माझ्या डोक्यावर आहे आणि मला धीर देत आहे.


SD SEED
Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

**HEAD OFFICE:**
7, Shivaji Nagar, Jalgaon - 425 001, Maharashtra, India.
Tel: (0257) 2235254 I Fax: (0257) 2234258 I Website: www.sdseed.in